## नि.दि.मु.क्र. १४/२०१३ मधील आयए क्र. १/२०२१ (निशाणी १४१) वरील आदेश

वादीने प्रस्तुत अर्ज प्रतिवादी क्र. ५ चे वारस अभिलेखावर घेणेस परवानगी मिळावी यासाठी दाखल केलेला आहे. त्याचे असे म्हणणे आहे की प्रतिवादी क्र. ५ हा दि. ०९/०१/२०२१ रोजी मयत झालेला आहे. प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी त्यांचे म्हणणे दाखल करुन सदरचा अर्ज खोटा व खोडसाळ असून तो प्रतिवादींना मान्य नाही. सबब, अर्ज फेटाळण्यात यावा अशी विनंती केली आहे. प्रतिवादी क्र. ५ मयत झाला या तथ्याबाबत प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी कोणताही वाद उपस्थित केलेला नाही. त्याच्या मृत्यूनंतर त्याच्या कायदेशीर प्रतिनिधींविरुध्द दावा पुढे चालविण्याचा अधिकार टिकून राहत आहे. अर्जात नमूद केलेले कारण हे शपथेवर नमूद करण्यात आलेले आहे व ते संयुक्तीक आहे असे मला वाटते. सबब, अर्ज मंजूर करण्यात येतो. वादीला मयत प्रतिवादी क्र. ५ चे कायदेशीर प्रतिनिधी अभिलेखावर घेण्याची परवानगी देण्यात येते. त्याअनुषंगे तात्काळ दावा दुरुस्ती करण्यात यावी व दुरुस्त दाव्याची प्रत सादर करण्यात यावी.

दि. १२/१०/२०२१ भानुप्रताप ब. चौहान
मालवण दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर

“CERTIFIED TO BE TRUE AND CORRECT COPY OF THE ORIGINAL SIGNED ORDER/JUDGMENT.”

Chandrakala Vasant Chavan
NAME OF STENOGRAPHER